एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेसाठी राज्यस्तरावर मंजूर करण्यात आलेल्या कार्यरत पदांच्या आकृतीबंधातील अस्थायी पदांना दिनांक १.१०.२०१७ ते दि. २८.२..२०१८ या कालावधीसाठी पुढे चालू ठेवण्यास मान्यता मिळणेबाबत

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
शासन निर्णय क्र. मबाआ-२०१६/प्र.क्र.४४/का-७-अ
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: १० ऑक्टोबर, २०१७.

वाचा: १) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र. मबाआ-२००२/प्र.क्र.९५/का-७ दिनांक ५ एप्रिल, २००३
२) केंद्र शासनाचे पत्र क्र. एफ-१४-९/२००५-सीडी-१, दि. ८.५.२००९ व दि. ६.३.२०१०.
३) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र. मबाआ-२०११/प्र.क्र.६८/का-७, दिनांक १०.१०.२०१३
४) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र. मबाआ-२०१३/प्र.क्र.२६६/का-७, दिनांक २१.१०.२०१३
५) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१५/प्र.क्र.५/१५/वित्तीय सुधारणा-१, दि. २० फेब्रुवारी, २०१५.
६) शासन निर्णय, क्र. मबाआ-२०१४/प्र.क्र.४६/का-७, दिनांक ५/३/२०१४
७) शासन निर्णय क्र. मबाआ-२०१०/प्र.क्र.२४२ (भाग-१)/का-७, दि. ५/९/२०१४.
८) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र. मबाआ-२०१५/प्र.क्र.५३/का-७अ, दि. ८/४/२०१५
९) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/विसु-१, दि.११/२/२०१६.
१०) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे क्र.एबाविसेयो/का-१/ अ-पदे/ २०१६/६८८, दि. २९/२/२०१६.
११) सहा.आयुक्त(प्रशासन), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे पत्र क्र. एबाविसेयो/ का-१/आस्था/२०१६/३२५७, दि. ७/१०/२०१७.
१२) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र. मबाआ-२०१५/प्र.क्र.५३/का-७अ, दि. २२/२/२०१७
१३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/आपुक, दि. ३/१०/२०१७.

शासन निर्णय:-

केंद्र शासनाच्या दि. ८.५.२००९ च्या पत्रातील मंजूर पदांच्या मर्यादेत एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत राज्यस्तरीय ४३ अस्थायी पदांना दि. २८.२.२०१६ पर्यत पुढे चालू ठेवण्यास शासन निर्णय दि. ८/४/२०१५ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांच्या पत्र क्र.एबाविसेयो/का- १/अ-पदे/२०१६/६८८, दि. १६.२.२०१७ ला अनुलक्षून आयुक्तालयातील कार्यरत ४३ अस्थायी पदे व दि. ५/९/२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजूर एक सह आयुक्तांचे पद अशा विभागाच्या आढाव्यांतर्गतमंजूर एएकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत राज्यस्तरावर कार्यरत असलेल्या ४३ पदांना दि. १.१०.२०१७ ते दि. २८.२..२०१८ पर्यत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्याची विनंती केली आहे.

२. याबाबत नमूद करण्यात येते की, दि. ५/९/२०१४ रोजीच्या शासन निर्णयाअन्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजनामध्ये एक सह आयुक्तांचे पद मंजूर करण्यास उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिली आहे. परंतु सदर प्रस्तावास अद्यापपर्यत मा.मंत्रीमंडळाची मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे सदर पदाला मुदतवाढ देता येणार नाही. तसेच सह आयुक्त, महिला व बाल विकास,पुणे या पदास यापूर्वीच मुदतवाढ देण्यात आली असल्यामुळे त्या पदाचा समावेश या विवरणपत्रामध्ये पुन्हा करणे संयुक्तिक ठरणार नाही. तसेच सहा.आयुक्त (प्रशासन) एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ५/३/२०१६ रोजीच्या पत्रान्वये वाहनचालकाचे एक पद व्यपगत झाले असल्याचे कळविले आहे.

३. सबब, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयातील सोबतच्या विवरणपत्रामध्ये नमूद ४२ अस्थायी पदांना दि. १/१०/२०१७ ते दि. ३१/१२/२०१७ पर्यत अथवा केंद्र शासनाच्या पत्रास अनुलक्षून अंतिम निर्णय होईपर्यत यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यत सदर पदे पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर पदे सहा महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त नाहीत असे आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी प्रमाणित केले आहे. त्या प्रमाणपत्राआधारे सदर पदे पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर कालावधीमध्ये कोणत्याही परिस्थितीत प्रशासकीय विभागांनी पदांच्या आढाव्यास (नव्याने निर्माण केलेल्या पदांसह) उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेऊन सुधारीत आकृतीबंध निश्चित करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास मुदतवाढी अभावी सदर अस्थायी पदांच्या वेतनाचा प्रश्न उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची राहील याची नोंद घ्यावी असे वाचा क्र (९) येथील शासन निर्णयामध्ये नमूद केले आहे.त्यानुसार आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय ,नवी मुंबई यांनी तात्काळ प्रस्ताव शासनास सादर करावा.

४. केंद्र शासनाच्या दि. ८.५.२००९ च्या सुधारित स्टापिंग पॅटर्ननुसार आकृतीबंध निश्चित करणे आवश्यक आहे. त्यासाठी पूर्वीची मंजूर पदे व सुधारित स्टापिंग पॅटर्ननुसार मंजूर पदे, अतिरिक्त ठरणारी पदे लक्षात घेवून सुधारित प्रस्ताव आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांनी पाठवावा. अन्यथा यापुढे सदर पदे पुढे चालू ठेवण्यास मान्यता दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/आपुक, दि.३/१०/२०१७. अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये सदर पदांना मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळाद्वारे उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१०१०१३०६०७८०३० असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2017.10.12 15:06:50 +05'30'

(ला.रा.गुजर)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे
२. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, बेलापूर, नवी मुंबई.
३. महालेखापाल,महाराष्ट्र राज्य १/२ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर

४. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
५. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,ठाणे
६. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई
८. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी,(आयुक्तालयामार्फत)
९. वित्त विभाग (का- व्यय-१४/अर्थसंकल्प-१९//वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय,मुंबई
१०. महिला व बाल विकास (का-४) आणि (का-६) मंत्रालय,मुंबई
११. निवड नस्ती, का-७अ

शासन निर्णय महिला व बाल विकास क्र. मबाआ-२०१६/प्र.क्र. ४४/का-७ अ, दिनांक १० ऑक्टोबर, २०१७

सोबतचे विवरणपत्र-अ

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी/ ग्रेड पे	मंजूर पदे
१	संचालक /आयुक्त	३७४००-६७०००/१००००	१
२	सह संचालक/उपआयुक्त	१५६००-३९१००/७६००	१
३	उपसंचालक	१५६००-३९१००/६६००	३
४	सहा. आयुक्त, गट अ/कार्यक्रम अधिकारी, सहाय्यक संचालक (वित्त व लेखा)	१५६००-३९१००/५४००	६
५	लेखाधिकारी	९३००-३४८००/४४००	१
६	कार्या. अधिक्षक	९३००-३४८००/४३००	२
७	लेखापाल/सहा.लेखाधिकारी	९३००-३४८००/४३००	२
८	लघुलेखक (उच्चश्रेणी)	९३००-३४८००/४४००	२
९	लघुलेखक (निम्नश्रेणी)	५२००-२०२००/२८००	२
१०	अधिक्षक/प्रमुख लिपिक (लेखा)	९३००-३४८००/४२००	६
११	सांख्यिकी सहायक/वरिष्ठ लिपिक	५२००-२०२००/२४००	९
१२	कनिष्ठ लिपिक/कनिष्ठ सहाय्यक	५२००-२०२००/१९००	४
१३	वाहन चालक	५२००-२०२००/१९००	०
१४	शिपाई	४४४०-७४४०/१३००	४
	एकूण		४३

Lalsing
Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2017.10.12 15:07:02 +05'30'

(ला.रा.गुजर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन